श्री जैन विद्याप्रसारक मंडळ, चिंचवड,
पुणे या संस्थेस अल्पसंख्यांक शैक्षणिक
संस्था म्हणून मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
शासन निर्णय, क्र: एसएमसी-२००३/(६४/०३) असंक.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ जुलै, २००५.

**संदर्भ:-** १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.एसएमसी-२००१/(१३७/०१)/असंक,दिनांक १७ जुलै २००२.
२) शासन निर्णय क्र: एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७ मे, २००३ व शासन शुध्दिपत्रक, दि. १८ फेब्रुवारी,२००५.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचे पत्र क्र.अमाशा/१०२००३/७०३८२/क दिनांक १३.१०.२००३

<u>प्रस्तावना</u>:- भारतीय संविधानातील अनुच्छेद २९ व ३० (१) अन्वये अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक संस्थांना असलेले शैक्षणिक संरक्षणविषयक अधिकार या संदर्भात मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्रशासन व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी), नवी दिल्ली तसेच राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या उच्चाधिकार समिती यांनी याबाबत वेळोवेळी विहित केलेली मार्गदर्शक तत्वे/आदेश विचारात घेऊन कोणत्या शैक्षणिक संस्थेला अल्पसंख्याक (धार्मिक/भाषिक) संस्था समजण्यात यावे, याबाबतचे निकष, अटी व कार्यपध्दती संदर्भ १) येथील शासन निर्णय, दि. १७ जुलै २००२ अन्वये विहित करण्यात आली आहे. या शासन निर्णयाच्या अधीन राहून " श्री जैन विद्याप्रसारक मंडळ, चिंचवड,पुणे "या संस्थेस अल्पसंख्याक दर्जा देण्यासंबधी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ),शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. (३) येथील त्यांच्या दिनांक १३/१०/२००३ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यानुसार सदरहू संस्थेला जैन(धार्मिक) अल्पसंख्याक संस्था म्हणून मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:- भारतीय संविधानातील अनुच्छेद २९ व ३० (१) अन्वये विहित तरतुदींच्या अनुषंगाने अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना असलेले शैक्षणिक संरक्षणविषयक अधिकार आणि या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ११ सदस्यीय खंडपीठाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी दिलेल्या न्याय निवाड्याच्या अधीन शासन निर्णय, दिनांक २७ मे, २००३ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश तसेच शासन निर्णय, दिनांक १७ जुलै, २००२ मधील तरतुदींच्या अधीन राहून "श्री जैन विद्याप्रसारक मंडळ, चिंचवड, पुणे " या संस्थेला शालेय शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्रातील त्या संस्थेच्या मान्यताप्राप्त शाळांतील विद्यार्थी प्रवेश तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ च्या कलम ३ (२) अन्वये कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करणे याकरिता सदरहू संस्थेला जैन(धार्मिक ) अल्पसंख्याक संस्था म्हणून पुढील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे -

(१) सदरहू "श्री जैन विद्याप्रसारक मंडळ, चिंचवड, पुणे " या संस्थेला अल्पसंख्यांक संस्था म्हणून त्या संस्थेच्या शालेय शिक्षण विभागाशी संबंधित मान्यताप्राप्त शाळांतील विद्यार्थी प्रवेश व अधिनियम, १९७७ च्या कलम ३(२) अनुसार कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करणे यासाठी सवलती लागू राहतील.

(२) संस्थेच्या अध्यापक विद्यालयाने शासनाच्या तसेच एनसीटीई, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वे व अटींचे पालन/पूर्तता न केल्याचे आढळून आल्यास विहित कार्यपध्दतीप्रमाणे कायदेशी कारवाई केली जाईल

(३) या आदेशान्वये अल्पसंख्यांक संस्था म्हणून दिलेल्या मान्यतेचा संस्थेने कोणत्याही प्रकारे गैरवापर केला असल्याचे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी केल्यानंतर प्रथमदर्शनी आढळून आल्यास, संस्थेला कारणे दाखवा नोटीस देऊन (त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन) अल्पसंख्यांक संस्था म्हणून दिलेली मान्यता रद्द करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. अशा प्रकरणी, गैरप्रकार किंवा गैरव्यवहार कोणत्या प्रकारचा व किती गंभीर स्वरुपाचा आहे याचा विचार करुन अल्पसंख्याक संस्था म्हणून दिलेली मान्यता रद्द करण्याच्या कार्यवाहीसह शासनाने संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना विहित कार्यपध्दती/नियमानुसार शैक्षणिक मान्यता/परवानगी दिली असल्यास अशी शैक्षणिक मान्यता रद्द करण्याबाबतही विहित कार्यपध्दतीनुसार कारवाई केली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

कल्पना

( कल्पना जं. चव्हाण )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्चमाध्यमिक),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे

शिक्षणाधिकारी,(प्राथमिक/माध्यमिक)जिल्हा परिषद,पुणे.

अध्यक्ष,श्री जैन विद्याप्रसारक मंडळ, चिंचवड,श्री फत्तेचंद मार्ग,चिंचवड गांव, पुणे

निवड नस्ती- असंक.

Acharya Shri Anand Rushiji English Medium Primary & Secondary School, Chinchwad, Pune-411033

Seema

PRINCIPAL

Acharya Shri Anand Rushiji

English Medium Secondary School

Chinchwadgaon, Pune - 411 033

महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक: अशैसं-२००९/९४२/प्र.क्र.३९/२००९/का.१,

दिनांक :- २३ जुलै, २००९.

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ, फत्तेचंद मार्ग, चिंचवड गांव, पुणे या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.२३.६.२००९ रोजी अर्ज सादर केला होता. दि.१०.७.२००९ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/ प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (जैन) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही धार्मिक (जैन) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

(Seal: अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन)

टी. एफ. थेकेकरा
(टी. एफ. थेकेकरा)
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

(Stamp: Acharya Shri Anand Rushiji English Medium Primary & Secondary School, Chinchwad, Pune-411033)

Seema
**PRINCIPAL**
Acharya Shri Anand Rushiji
English Medium Secondary School
Chinchwadgaon, Pune - 411 033